अडल्या नडलेल्याला मदत करावी. नीतीनं वागावं, रीतीनं जगावं, भीती न बाळगता सत्याच्या वाटेनं चालत राहावं, हा संस्कारमंत्र विठ्ठलरावांनी आयुष्यभर जपला. कोंडाबाई आणि हरीबाई या त्यांच्या बहिणी याच विचारानं सुसंस्कारित झालेल्या होत्या. यमुनाबाईंशी विवाह झाल्यावर त्यांची भक्कम साथ मिळाल्याने विठ्ठलरावांचे सामाजिक कार्य वाढीसच लागत गेले. तालुक्याच्या ठिकाणी जवळपासच्या गावांहून सतत माणसं येत. अशा माणसांना दादांचा मोठा आधार वाटे. उठ-बस करायला, मुक्कामाला दादांचं घर त्यांच्यासाठी हक्काचं होई. स्वत:सोबत शिदोरी असायची. शिदोरी नसली किंवा संपली तरी यमुनाबाई अन्नपूर्णेच्या प्रेमानं साऱ्यांना जेवू घालायच्या. शेती वाडी सांभाळून सामान्य माणसाप्रमाणं जीवन जगणाऱ्या व्यक्तिगत जीवन कुटुंबजीवन समाजजीवनाशी एकरूप झाले होते.

**वाचनालय व व्यायामशाळा :** निझाम काळातील वाचनालये आणि व्यायामशाळां यांचे कार्य व्यापक स्वरूपाचे होते. स्वातंत्र्यसंग्रमातील ही महत्त्वाची लढाकेंद्रे होती. नागरी स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या निझामाने नियतकालिके आणि पुस्तकांचा प्रचार प्रसारावर बंदी टाकलेली होती. देशभक्ती जागवणाऱ्या, अन्यायाविरुद्ध बोलणाऱ्या कोणत्याही विचार माध्यमाला, संस्थानात परवानगी नव्हती. त्यामुळं सारं करावं लागायचं ते जोखीम पत्करूनच!

१९३२ मध्ये परतूर येथे आनंद वाचनालयाची स्थापना श्री. विठ्ठलरावांनी केली. हे वाचनालय व वाचनालयातर्फे विविध उपक्रम चालवण्यात श्री. सखाराम आबाजी खापरकुंटीकर, श्री. रंगनाथ भोलानाथ औटी, श्री. बळवंतराव हनुमंतराव देशपांडे या सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. या वाचनालयातर्फे चालवल्या जाणाऱ्या व्याख्यानमालेच्या निमित्त्यानं बॅरिस्टर विनायकराव कोरटकर, रामचंद्रराव नांदापूरकर, बाबासाहेब परांजपे, श्रीनिवासराव बोरीकर आदी वक्त्यांचे प्रभावी विचार युवा पिढीचे मन चेतवत होते. आनंद वाचनालयाचे सेक्रेटरी म्हणून विठ्ठलरावांनी मोठ्या सजगतेने कार्य केले. सरकारनं बंदी टाकलेली अनेक प्रेरक पुस्तकं या वाचनालयात मोठ्या खुबीनं वाचकांपर्यंत पोचवली जात. लोकांमध्ये वाचनाची आवड रुजावी, नवीन विचार, स्वातंत्र्य समता बंधुता या कल्पना रुजाव्यात आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी इथल्या तरुणाईचं रक्त सळसळावं हा या मागचा उद्देश होता.